# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## VALUE ADDED COURSE:- DIGITAL TEACHER NEP 2020 COMPLIANCE:- MASTERING ICT THROUGH LIVE PROJECT

## उद्घाटन समारंभ अहवाल

तंत्रज्ञानाच्या नवदिशा स्वीकारून गुणवत्तापूर्ण अध्यापनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलताना, शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक ४ जुलै २०२५ रोजी "**DIGITAL TEACHER NEP 2020 COMPLIANCE:- MASTERING ICT THROUGH LIVE PROJECT**" या विषयावर आधारित कोर्सच्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या (IQAC) वतीने मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात परमेश्वरी वंदनेने झाली. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन हे महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले आणि कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी मा. सौरभ सोमाणी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या मंगलप्रसंगी संपूर्ण सभागृहात एक सकारात्मक उर्जा निर्माण झाली. यानंतर कार्यक्रमाच्या संयोजिका प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे स्वागत केले आणि प्राचार्य डॉ. भोसले यांनी प्रमुख अतिथी मा. सौरभ सोमाणी यांचे मनःपूर्वक स्वागत करत त्यांचा परिचय करून दिला.

प्रास्ताविक करताना डॉ. सुभेदार यांनी ICT (Information and Communication Technology) चा शिक्षक प्रशिक्षणामधील महत्त्व पटवून दिले. त्यांनी नमूद केले की, आजच्या युगात शिक्षकांनी डिजिटल साधनांचा योग्य वापर करत विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन मा. सौरभ सोमाणी यांनी केले. त्यांनी डिजिटल युगातील शिक्षकांच्या भूमिकेवर सखोल विचार मांडले. "Digital teacher" ही केवळ एक संकल्पना नसून, आजच्या काळात ती एक आवश्यकता आहे, असे ते म्हणाले. त्यांनी अध्यापन कौशल्य, तांत्रिक सक्षमता आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या नव्या पद्धती यांचे समन्वय साधण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी व्यक्त करताना, "गुणवत्तापूर्ण शिक्षक घडवायचा असेल, तर त्यांना नव्या युगाशी सुसंगत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन केले. त्यांनी अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची सविस्तर माहिती दिली आणि सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या आभारप्रदर्शनाची जबाबदारी श्रीमती जागृती पडवळ यांनी समर्थपणे पार पाडली. त्यांनी सर्व मान्यवरांचे तसेच उपस्थित प्रशिक्षणार्थी छात्राध्यापकांचे मन:पूर्वक आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे निवेदन श्री. रोहन भोईर यांनी अत्यंत ओघवत्या आणि प्रभावी शैलीत पार पाडले.




मा.प्राचार्य डॉ.रमा भोसले मॅडम सरस्वती पूजन करताना




प्रमुख अतिथी मा. सौरभ सोमाणी यांच स्वागत




कार्यक्रमाची प्रस्तावना करताना प्रा.डॉ. प्रियांका सुभेदार मॅडम




मा. सौरभ सोमाणी सर ICT AI CHORUS विषयी मार्गदर्शन करताना







अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य मा. रमा भोसले मॅडम

आभार प्रकटीकरण करताना श्रीमती. जागृती पडवळ







सूत्रसंचालन करताना श्री. रोहन भोईर